शिवाजी विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय,

कॉंग्रेस नगर, नागपुर - 12

वर्ग - 12 वा

विषय - मराठी          वेळ - 03.00 तास

गुण - 80

## विभाग 1 - गद्य

कृती - 1 अ] खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [08]

1] लेखिकेच्या सात दिवसांच्या पर्यटनातील शेवटचे टप्पे. 02

अ] ---------

ब] ---------

2] अ] तोलो लिंगच्या पायथ्याशी बांधलेले स्मारक - [ ] 02

ब] भयाण पर्वतावर लढणारे - [ ]

एका पर्यटकाच्या नजरेतून सुरू केलेला सात दिवसांचा प्रवास-लेह, नुब्राव्हॅली, पँगाँग लेक आणि सरतेशेवटी द्रास, कारगिल! आता शेवटचा टप्पा शिल्लक होता. कारगिल आणि द्रास! सोबत असलेला लडाखी ड्रायव्हर स्टानझिन पाच वर्षांपूर्वी घडलेल्या कारगिल युद्धाच्या आठवणींना उजाळा देत होता. गाडी पुढे जात होती. आम्ही द्रासला पोहोचलो. शासकीय विश्रामगृहात दोन खोल्या मिळाल्या. विजय च्या स्मारकापर्यंत पोहोचलो. समोर दिसणारा तोलोलिंग, डावीकडे नजर गेली, की दिसणारा रौकीनॉब, हंप, इंडिया गेट, थ्री पिपल, टायगर हिलचा सुळका, त्याच्या बाजूचा पॉईंट ४८७५-भारतीय जवानांनी काबीज केलेल्या शिखरांची रांग. होय, याच मातीतून धूळ अंगावर घेत उंच १६००० फुटांवर बर्फाच्छादित शिखरांवर, शत्रूच्या तोफा पहाडावरून आग ओकत असताना ह्या भयाण पर्वतांवर आमचे धैर्यधर अथक चढत राहिले होते. मृत्यू समोर दिसत असतानाही त्याच्या जबड्यात हात घालून मृत्यूलाच आव्हान देणारी बावीसतेवीस वर्षांची तेजोमय स्फुल्लिंगं होती ती! ज्यांना आशीर्वाद द्यायचे, त्यांच्यासमोर नतमस्तक होऊन सलामी देणं किती कष्टप्रद आहे, ह्याची जाणीव झाली. थरथरत्या हातांनी, डबडबलेल्या डोळ्यांनी त्या स्मारकाला सलाम केला.

3] स्वमत - अभिव्यक्ती - 04

कारगील युद्धात भारतीय सैनिकांनी दाखवलेल्या पराक्रमा-बद्दल तुमचे मत मांडा. किंवा - भयाण पर्वतांवर अथक चढणारे आमचे धैर्यधर - या ओळीतून भारतीय जवानांचे तुम्हास आवडणारे गुण ~~[illegible]~~ विशद करा.

कृती-1 अ) खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा [08]

1) लेखकाच्या दातदुखीची वैशिष्ट्ये 02

अ) - - - - - - -

ब) - - - - - - -

2) खालील चौकटी पूर्ण करा 02

अ) लेखकाच्या घरी होणाऱ्या परिसंवादाचा

विषय - [ ]

ब) लेखकाच्या घरी होणाऱ्या परिसंवादाचा

अध्यक्ष- [ ]

उतारा ( पाठ्यपुस्तक पृष्ठ क्र.४५ व ४६ )

दातदुखीच्या काळात माझी सहनशक्ती पार खलास झालेली असते. दाते किंवा दातार ह्या दातांशी जवळीक दाखवणाऱ्या माणसांनाही भेटू नये असे वाटते! माझ्या दातदुखीचे आणखी एक वैशिष्ट्य असे, की माझ्या विव्हळण्याने शेजारीपाजारी गोळा होतात आणि माझ्या दाताच्या अध्यक्षतेखाली दातदुखी, ती का होते, टाळावी कशी आणि झाल्यावर कोणते उपचार करावेत यावर एकदा तरी परिसंवाद होतोच. उपस्थित वक्ते मोठ्या हिरिरीने त्यात भाग घेतात. हीच मंडळी एवढ्या मोठ्याने बोलतात, की माझे विव्हळणे त्यात बुडून जाते. माझा अनुभव असा, की दातदुखीवरील चर्चेने दातदुखी मुळीच कमी होत नाही! दातदुखीवरील खूप उपचार मला पाठ झाले आहेत. माझा दात दुखू लागला, की मी बायकोला त्यातले काही उपचार करायला सांगतो आणि तीही आपले काही उपचार करते. अशी मिळून २०-२५ प्रकारची औषधे, बोळे माझ्या दातामागे लागतात. चार दिवसांनी दात दुखायचा थांबतो. कशामुळे थांबला याचा शोध करायच्या मी भानगडीत पडत नाही. दात दुखणे थांबल्याचे कळल्याबरोबर परिसंवादातील सगळे वक्ते आपलाच उपचार लागू पडला की नाही याची खात्री करून घेण्यासाठी येतात. मी कुणाचेही मन दुखवत नाही. प्रत्येकाला त्याने सुचवलेल्या उपायानेच गुण आल्याची कबुली मोकळा होतो. सगळे खूष होतात. दंतआघाडीवर सर्वत्र सामसूम होते. एखाददुसरा महिना जातो आणि पुन्हा तोच दात, तोच ठणका आणि तेच उपचार यांचा पुन्हा प्रयोग होतो.

04

3) स्वमत- अभिव्यक्ती -
दातदुखीवरती लेखकाच्या घरी होणारे उपचार तुमच्या शब्दांत मांडा

किंवा

दातांची काळजी कशी घ्यावी- तुमच्या शब्दांत लिहा.

कृती-1 इ) - खालील उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा. [4]

1) खालील कृती करा. 02

अ) न बोलताही संवाद होणारा काळ मागे पडून आलेला नवा काळ -

ब) तत्वज्ञान आरपार बिंबवल गेल आहे-

न बोलताही संवाद होणारा संवेदनशील काळ मागं पडून आता खूप बोलूनही काळीज न ओलावणारा काळ आला आहे. कारणं अनेक आहेत; पण मला जाणवणारं मुख्य कारण म्हणजे- -माणूस मिथ्या सोनं सत्य॰ हे तत्त्वज्ञान आ पैसा मिळवला की माणूस सुखी होतो॰, हा निष्कर्ष गरिबीतून येऊ शकतो; पण गरिबी दूर करताना दुसरेच एक आंतरिक दारिद्र्य निर्माण होऊ नये, याची दक्षता मार्केटिंग॰च्या भरात घेतली गेली नाही.यांतून संवादसुसंवाद,प्रेम,माया, वात्सल्य कायमिळणार? रपार बिंबवलं गेलं आहे. -भावनेवर का जगता येणार? असे प्रश्नविचारणारा एक वर्ग जगात निर्माण झाला. या वर्गाच्याहातात प्रसारमाध्यमं होती, उद्योगधंदे होते. सूत्रधाराने बाहुल्यांना खेळवावं त्याप्रमाणे ह्या मंडळींनी गेल्यापंचवीस वर्षात साऱ्या जगाचं एका भव्य -मॉल॰मध्ये रूपांतर केलं, जिथे पैसा बोलतो, मन मात्र मुकं राहतं. एकदा पैशानेच जगता येतं-पैशासाठीच जगायचं असतं, हाच जगण्याचाउद्देशझाला, की मग शिक्षण पैशासाठीच होतं. सजणं, धजणं, प्रेम, कलानिर्मिती, श्रद्धा, भक्ती, मदिरं यांचीही दुकानं होतात, मग दुकानातली भाषा खरेदी-विक्रीचीच असते. तिथे -संवाद॰ नसतो. असतो तो खरेदी-विक्रीचा व्यवहार.

2) पैसा हाच जगण्याचा उद्देश असल्यास होणारे परिणाम- 02

विभाग 2 पद्य

कृती 2 अ) - खालील कवितेच्या आधारे सुचनेनुसार कृती करा. [08]

1) खालील कृती करा. 02

अ) अश्रुंची सोबत कवीला यासारखी वाटते. [ ]

ब) इतरांना सुखावणाऱ्या परंतु कवीला झळा [ ] देणाऱ्या.

2) कवीसोबत पुढील गोष्टींनी केलेल्या कृती लिहा. 02

अ) आयुष्य - - - - - - - - - -

ब) दुःख - - - - - - - - -

क) सावल्या - - - - - - - -

रंगुनी रंगांत साऱ्या रंग माझा वेगळा!
गुंतुनी गुंत्यांत साऱ्या पाय माझा मोकळा!
कोण जाणे कोठुनी ह्या सावल्या आल्या पुढे;
मी असा की लागती ह्या सावल्यांच्याही झळा!
राहती माझ्यासवें हीं आसवें गीतांपरी;
हें कशाचें दुख ज्याला लागला: माझा लळा!
कोणत्या काळीं कळेना मी जगाया लागलों
अन् कुठे आयुष्य गेलें कापुनी माझा गळा!
सांगती -तात्पर्य॰ माझें सारख्या खोट्या दिशा :
चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!॰॰
माणसांच्या मध्यरात्रीं हिंडणारा सूर्य मी :
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा!

3) अभिव्यक्ती - 04

1) दुःखाच्या प्रसंगातून बाहेर पडण्यासाठी तुम्हाला माहित असलेले उपाय लिहा.

2) तुमच्या मधील इतरांपेक्षा वेगळे असणारे गुण तुमच्या शब्दांत लिहा.

आ] खालील ओळींचा अर्थ स्पष्ट करा [04]

" राहती माझ्यासवें ही आसवे गीतांपरी,
हे कशाचे दुःख ज्याला लागला लळा!"

" सांगती "तात्पर्य" माझे सारख्या खोट्या दिशा :
" चालणारा पांगळा अन् पाहणारा आंधळा!"

इ] काव्यसौंदर्य. [04]

" रंगुनी रंगात साऱ्या रंग माझा वेगळा।
गुंतुनी गुंत्यात साऱ्या पाय माझा मोकळा।
या ओळीमधील विचार सौंदर्य स्पष्ट करा.

" कोणत्या काळी कळेना मी जगाया लागलो
अन कुठे आयुष्य गेले कापुनी माझा गळा।"
या ओळींमधील भावसौंदर्य स्पष्ट करा.

रसग्रहण -

" माणसाच्या मध्यरात्री हिंडणारा सुर्य मी
माझियासाठी न माझा पेटण्याचा सोहळा।"

---

विभाग 3- साहित्यप्रकार- कथा

कृती 3. खालील उताऱ्याच्या आधारे सूचनुसार कृती करा [04]

02

अ- 1] एका वाक्यात उत्तरे लिहा.
अ] कथानकाचे प्रयोजन लिहा
ब] नाट्यमयता निर्माण होणारे घटक लिहा

कथेत 'घटना' हा महत्त्वाचा भाग ठरतो. कथेत या मूळ घटनेलाच ऋकथाबीजऋ असे म्हणतात. कथानकात घटना, प्रसंग, पात्रांच्या कृती, स्वभाववैशिष्ट्ये, वातावरण इत्यादींचे तपशील हळुवारपणे उलगडत जातात. कथेत कथानकातील घटकांचे एकत्रीकरण केले जाते. या एकत्रीकरणातून कथेची मांडणी आकाराला येते. हे कथानक उलगडताना त्यातील प्रवाहीपण जपले जाते. कथाकाराच्या मनात कथेच्या अनुषंगाने निर्माण झालेला भावाशय वाचकापर्यंत पोहोचवण्यासाठी कथन करणे हे कथानकाचे प्रयोजन असते.

पात्रचित्रण हा कथेचा महत्त्वपूर्ण घटक आहे. पात्रचित्रणातून कथेचा आशय पुढे पुढे जात राहतो. कथाकार एखाद्या पात्राची वृत्ती, कृती, उक्ती, भावना, विचार, कल्पना, संवेदना, जीवनदृष्टी, जीवनपद्धती इत्यादींच्या चित्रणातून त्या व्यक्तीची शब्दरूप प्रतिमा तयार करत असतो. या शब्दरूप प्रतिमेला 'पात्र' असे म्हणतात. कथेतील पात्रांना वास्तवातील माणसांप्रमाणे रेखाटले जाते, म्हणून वाचकांची त्या पात्रांशी जवळीक साधली जाते. ही पात्रे कथाकाराची 'स्व' निर्मिती असते.

कथेला स्थळ–काळाबरोबरच सामाजिक, भौगोलिक, सांस्कृतिक, राजकीय इत्यादींनी युक्त वातावरण असते. वातावरणाचा वाचकांवर परिणाम होऊन तो कथानकाशी एकरूप होतो. वातावरणाचा पट जितका सघन तितकी कथा सकस होते.

कथेत चांगल्या–वाईटाचा संघर्ष असतो. त्यातूनच नाट्यमयता निर्माण होते. या संघर्षातूनच कथा उत्कर्षबिंदूपर्यंत पोहोचते.

2] कथाकाराच्या 'पात्र' या शब्दरूप प्रतिमेची दोन वैशिष्ट्ये लिहा. 02

[06]

आ] खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा

अ] घर सोडण्यामागचा अनुचा विचार तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

ब] गावातल्या उचापती करणाऱ्या लोकांबद्दल तुमचे मत लिहा.

क] 'टॅक्सी ड्रायव्हर' हे पात्र तुम्हाला आवडण्याचे वा न आवडण्यामागचे कारण स्पष्ट करा.

ड] 'गढी' व 'वान नदी' या दोन प्रतीकांतून गावातील स्थित्यंतराचे दर्शन कशाप्रकारे घडवले आहे, ते प्रत्येकी एकेका उदाहरणाद्वारे स्पष्ट करा.

विभाग 4- उपयोजित मराठी

कृती 4 - अ] खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. [04]

1] मुलाखत घेण्यामागील हेतू स्पष्ट करा.

2] माहितीपत्रकाचे स्वरूप स्पष्ट करा.

3] अहवालाची आवश्यकता लिहा

4] बातमी आणि वृत्तलेख यांतील फरक स्पष्ट करा.

आ] खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा. [10]

1] खालील मुद्यांच्या आधारे 'मुलाखतींची पुर्वतयारी' याविषयी लिहा.

मुलाखत म्हणजे ------ मुलाखतीचा पाया ------ ज्यांची मुलाखत घ्यायची त्यांच्याबद्दलची माहिती ---- ---- मुलाखतीची उद्दिष्टये ------ मुलाखतीचे माध्यम.

2] खालील मुद्यांच्या आधारे 'माहितीपत्रकाचे 'माहितीपत्रकाचे स्वरूप स्पष्ट करा.

माहितीपत्रक म्हणजे ------ जनमत आकर्षित करणारे लिखित माध्यम ---- ग्राहकाला होणारे फायदे ------ माहितीपत्रकाचा हेतू ---- वेगळेपण व वैशिष्टये.

3] खालील मुद्यांच्या आधारे अहवाल लेखनाची आवश्यकता विशद करा.

अहवाल म्हणजे ----- अहवाल न लिहिल्यास भविष्यात येणाऱ्या अडचणी ----- अहवालाची विविध क्षेत्रातील गरज ------ समस्या निवारण्यातील उपयोगिता ----- अहवाल तयार करण्याची आवश्यकता.

4] खालील मुद्यांच्या आधारे 'बातमीवर आधारित वृत्तलेख' याबाबत तुमचे मत लिहा.

वृत्तलेख म्हणजे ---- घटनाधारित लेख ---- संदर्भाची माहिती ----- मुद्यांचे विश्लेषण --- तज्ञांचे सहकार्य ------ विषयाला मर्यादा नाही.

## विभाग-5 व्याकरण व लेखन

[10]

कृती-5. अ) सूचनेनुसार कृती करा. 02

1). कंसातील सूचनांनुसार वाक्यांचे रूपांतर करा-

अ) मुलांनी शिस्त पाळणे खूप आवश्यक आहे. (प्रश्नार्थी वाक्य)

ब) क्रिकेट मालिकेत भारतीय संघ पराभूत झाला. (नकारार्थी वाक्य)

02

2) पुढील सामासिक शब्दांचा विग्रह करा.

अधोरेखित शब्दांमध्ये दडलेले दोन शब्द ओळखून चौकटी पूर्ण करा.

| | | |
|---|---|---|
| 1) प्रतिक्षण - | | |
| ब) शब्दार्पण - | | |
| क) योग्यायोग्य - | | |
| ड) लंबोदर - | | |

02

3) पुढील वाक्यांचे प्रयोग ओळखा-

अ) कप्तानाने सैनिकांना सूचना दिली.

ब) मुले प्रदर्शनातील चित्रे पाहतात.

02

4) पुढील ओळींतील अलंकार ओळखा.

अ) ह्या आंब्यासारखा गोड आंबा हाच

ब) आईसारखे दैवत आईच।

5) पुढीलपैकी कोणत्याही दोन वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यांत उपयोग करा. 02

अ) रंगून जाणे

ब) आटापिटा करणे

क) आग ओकणे

ड) अंगावर काटा येणे

कृती 5 - [आ] खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे 200 ते 250 विषयावर निबंध लिहा. [10]

1] माझा वर्गमित्र

2] श्रावणातला पाऊस

3] एका संगणकाचे मनोगत

4] भ्रमणध्वनी (मोबाईल) बंद झालं तर

5] समाज आणि आजचा युवक